N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**

प्रथम खबर अहवाल

(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** सातारा  **P.S.(ठाणे):** वाई  **Year (वर्ष):** 2019

**FIR No.**(प्रथम खबर क्र.): 0186  **Date and Time of FIR** (प्र. ख. दिनांक आणि वेळ): 02/10/2019 00:45 बजे

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 12 |

3. (a) **Occurrence of offence** (गुन्ह्याची घटना):

1. **Day**(दिवस): मंगलवार  **Date From** (दिनांक पासून): 01/10/2019

**Time Period** (कालावधी): पहर 5  **Date To** ( दिनांक पर्यंत): 01/10/2019

**Time From** (वेळेपासून): 13:00 बजे

**Time To** (वेळेपर्यंत): 13:00 बजे

(b) **Information received at P.S.** (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):

**Date** (दिनांक ): 02/10/2019  **Time** (वेळ): 00:24 बजे

(c) **General Diary Reference** (रोजनामचा संदर्भ

**Entry No.** (नोंद क्र.): 002  **Date & Time** (दिनांक आणि वेळ): 02/10/2019 00:24 बजे

4. **Type of Information** (माहितीचा प्रकार): लेखी

5. **Place of Occurrence** (घटनास्थळ):

1.(a) **Direction and distance from P.S.**(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर): दक्षिण, 1 किमी

**Beat No.** (बिट क्र.):

(b) **Address** (पत्ता): धोम पाटबंधारे शाखा वाई ,धोम डावा कालवा, जलसंपदा विभाग वाई या ,कार्यालयाचे समोर

(c) **In case, outside the limit of this Police Station, then** (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):

**Name of P.S.**(पोलीस ठाण्याचे नाव):

**District(State)** (जिल्हा(राज्य)):

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): अस्लम रसुल शेख

(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1983  (d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):  **Date of Issue** (दिल्याची तारीख):

**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

(g) **Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License,PAN)**
ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No.(अ. | Id Type (ओळखपत्राचा प्रकार) | Id Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

**(h) Address** (पत्ता):

| S.No.(अ. क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | ओझर्डे ,वाई ,भुईंज,सातारा,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | ओझर्डे ,वाई ,भुईंज,सातारा,महाराष्ट्र,भारत |

**(i) Occupation** (व्यवसाय):

**(j) Phone number** (फोन नं.): **Mobile** (मोबाइल नं.): 91-9921992398

**7. Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | राजेंद्र वसंतराव कदम | | | 1. गाडेबाग आळी, बावधन,वाई,वाई, सातारा,महाराष्ट्र,भारत |
| 2 | श्री.सुहास बाळासाहेब सुर्यवंशी | | | 1. केजळ ,वाई,भुईंज,सातारा,महाराष्ट्र,भारत |

**8. Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

**9. Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. मध्ये)) |
|---|---|---|---|---|
| 1 | इलेक्ट्रिकल आणि इलेक्ट्रॉनिक सामान | सि.डी. प्लेअर | 500/ रु किमतीचे मेमरी कार्ड | 500.00 |
| 2 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 23000/ त्यामध्ये 500 रु. दराच्या 46 चलनी नोटा | 23,000.00 |

**10 Total value of property (In Rs/-)**-(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)): 23,500.00

**11 Inquest Report / U.D. case No., if any** (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

| S.No. (अ. क्र.) | UIDB Number (यु.आय.डी. बी.क्र.) |
|---|---|

**12 First Information contents** (प्रथम खबर हकीकत ):

खबरी जबाब दिनांक 01/10/2019मी,अस्लम रसुल शेख, वय 36 वर्षे, व्यवसाय - शेती, रा. ओझर्डे ता. वाई जि. सातारा, मोबाईल नंबर 9921992398समक्ष वाई पोलीस स्टेशन येथे हजर राहुन खबरी जबाब देतो की, मी वरील ठिकाणी माझे कुटुंबासमवेत राहणेस आहे. मी व माझा भाऊ असे आमचे दोघांचे नावे ओझर्डे गावामध्ये गट क्रमांक 400 मध्ये एकुण 1 हेक्टर 64 आर जमीनीपैकी 0.36 आर क्षेत्र माझे व माझा भाऊ महंमद याचे नावावर असुन त्यामध्ये आम्ही दोघेही त्यामध्ये शेती करीत असतो.आमचे शेतजमीनीमधुन कनोल गेलेला असल्याने सदरची शेतजमीन दोन भागांमध्ये विभागलेली आहे. त्यापैकी एका शेताला कनोलचे पाणी आपोआप जात असते त्याची शासनाचे नियमाप्रमाणे पाणीपटटी गावचे पाटकरी यांचेकडे देत असतो किंवा धोम पाटबंधारे विभाग वाई यांचे कार्यालयाता येवुन भरत असतो, आमचे मागील तीन वर्षाची पाणीपटटीचे बिल थकित आहे.तसेच दुसरे शेत कनोलच्या पाणीपातळीच्यावर असल्याने सदर शेताला पाणी पोहचत नसल्याने सदर शेताला पाणी पुरविण्यसाठी कनोलवरुन पाच एचपीची मोटार बसवुन पाणी उचलण्यासाठी आवश्यक असलेला परवाना काढणेसाठी मी धोम पाटबंधारे विभाग वाई येथे गेलो त्यावेळी तेथे मला पाटकरीकदम भेटले त्यांनी मला सांगितले की, मी तुमचे परवान्याचे संपुर्णकामकरुन परवाना मिळवुन देतो तु मला एकुण मिळुन तीस हजार रुपये दे असे सांगितले त्यावेळी मी त्यांना सांगितले कि मला एवढे जमणार नाही काही कमी करा, त्यावेळी पाटकरी कदम यांनी मला सांगितले की, मला आता सातबारा, खाते उतारा, शंभर रुपयेचे पाच स्टम्प दया, मला तुमची फाईल बनवायला दोन हजार रुपये लागतील ते लगेच आता दया, असे सांगितले, त्यानंतर मला तेवीस हजार रुपये दया, म्हणजे तुमची फाईल पुढे पाठवितो, त्यानंतर मला तुमचा परवाना मिळाल्यानंतर पाच हजार रुपये दया, असे सांगितले त्यावेळी मी त्यांना स्टम्प व कागदपत्रे आणुन नाईलाजाने दोन हजार रुपये व साता बारा, खाते उतारा, शंभर रुपयांचे पाच स्टम्प इत्यादी कागदपत्रे फाईल बनविण्यासाठी दिले.त्यानंतर दिनांक 30/09/2019 रोजी पाटकरी कदम यांनी मला फोन करुन ऑफिसला येण्याबाबत सांगितले त्यावेळी पाटकरी कदम यांचेकडे त्यांचे ऑफिसला वाई येथ ेगेलो त्यावेळी पाटकरी कदम यांनी माझ्या प्रकरणाच्या तीन फाईलवर सहया घेवुन तुमचे पाणीपरवान्याचे काम पुर्ण करुन देतो ते आपले ठरल्याप्रमाणे मला तेवीस हजार रुपये आता दया व परवाना मिळाल्यानंतर पाच हजार रुपये दया असे सांगितले, आणी तुमचे ते तीन वर्षाचे पाणीपटटीचे पैसे पाटकरी सुर्यवंशी यांचेकडे लवकर भरुन टाका म्हणजे काही अडचण येणार नाही असे सांगितले. त्यावेळी मी त्यांना

तेथे हो म्हणुन निघुन आलो आहे. त्यानंतर मी, दिनांक 30/09/2019 रोजी श्री.शिर्के साहेब, पोलीस उपअधीक्षक,न्टी करप्शन ब्युरो सातारा यांचेशी संपर्क साधुन त्यांची वाई येथे भेट घेवुन मला पाटबंधारे विभाग वाई येथील पाटकरी कदम हे माझी पाणी उपसा परवान्याची फाईल तयार करुन पाणी परवाना मिळवुन देण्यासाठी लाच मागणी करीत असलेबाबत लेखी तक्रारी अर्ज दिला. त्यावेळी शिर्के साहेबांनी मला दिनांक 01/10/2019 रोजी सकाळी 10.00 वाजणेचे सुमारास वाई शहराचे अलीकडे वाई - वाठार जाणारे रस्त्यावर कृष्णा पुलाचे अलीकडे येवुन थांबुन राहणेबाबत सुचना दिली.त्यानंतर मी दिनांक 01/10/2019 रोजी सकाळी 10.00 वाजणेचे सुमारास वाई शहराचे अलीकडे वाई - वाठार जाणारे रस्त्यावर कृष्णा पुलाचे अलीकडे येवुन थांबुन राहिलो. काहीवेळाने शिर्के साहेबांनी मला त्यांचे खाजगी तवेरा वाहनाजवळ बोलावुन घेतले. त्यावेळी तेथे शिर्के पोलीस उपअधीक्षक, पंच व सापळा पथक हजर होते. त्याठिकाणी श्री.शिर्के साहेबांनी, माझी व म.रा.वि.वि.कंपनीचे सातारा कार्यालयातील 1) उदय चंद्रकांत काटकर, निम्नस्तर लिपीक 2) प्रसाद शरद भागवत, कनिष्ठ सहायक या दोन पंचांसह, सापळा पथकाची ओळख करुन दिली. त्यानंतर मी माझी तक्रार थोडक्यात कथन केली त्यानंतर शिर्के साहेबांनी मी दिनांक 30/09/2019 रोजी दिलेला अर्ज दोन्ही पंचाना वाचन करणेस दिला, त्याचे शिर्के साहेब व दोन्ही पंचांनी अवलोकन केले. त्यानंतर माझ्या तक्रारीप्रमाणे माझ्याकडे धोम पाटबंधारे शाखा वाई येथील पाटकरी कदम यांनी लाच मागणी केली आहे अगर कसे? याची पडताळणी करण्यासाठी पंच नं.1 म्हणुन काटकर व पंच नं.2 म्हणुन भागवत यांनी काम करण्याचे शिर्के साहेबांनी ठरवुन मी दिले तक्रारी अर्जावर दोन्ही पंचांनी व शिर्के साहेबांनी सहया केल्या. त्यानंतर शिर्के साहेब यांनी मला व पंच न. 1 यांना पडताळणी कारवाईचे अनुषंगाने आवश्यक त्या सुचना देवुन व्हाईस रेकर्डरसह माझ्याकडील दुचाकी वाहनाने पंच नं.1 यांचे सोबत पाटकरी कदम यांची भेट घेण्यासाठी पाठवून दिले. केले पडताळणी कारवाईमध्ये पाटकरी कदम यांची माझ्याशी समक्ष भेट झाली. त्यावेळी पाटकरी कदम यांनी माझे शेतीसाठी कनोलवरुन पाच एचपीची मोटार बसवुन पाणी उचलण्यासाठी आवश्यक असणारी परवानगीची फाईल तयार करुन परवानगी मिळवुन देण्यासाठी 30,000/- रुपयांची लाच मागणी केली त्यातील दोन हजार रुपये यापुर्वी स्विकारले असुन पाच हजार रुपये परवाना मिळाल्यानंतर देण्याचे ठरवुन राहीलेले तेवीस हजार रुपयांची लाच मागणी करुन ती लाच रककम लागलीच आणुन देण्याची शिर्के साहेबांची व दोन्ही पंचांची खात्री झाली. तसेच पाटकरी कदम यांनी माझ्याकडे लाच मागणी केली त्यावेळी पाटकरी कदम हे माझ्याकडे लाच मागणी करीत असताना कार्यालयातील पाटकरी सुर्यवंशी त्याठिकाणी हजर राहुन माझेत व पाटकरी कदम असे आमचे चर्चेमध्ये सहभाग घेवुन त्यांनी पाटकरी कदम यांना लाच रक्कम घेण्यासाठी व तक्रारदार यांना लाच रक्कम देण्यासाठी प्रोत्साहन दिल्याची ध्वनिमुद्रीत झालेल्या संभाषणावरुन व माझ्या तसेच पंच नं.1 यांचे हकिकतीवरुन शिर्के साहेबांची व दोन्ही पंचांची खात्री झाली.त्यानंतर शिर्के साहेब यांचे सुचनेनुसार मी 23000/- रुपये हजर केले. त्या नोटांचे क्रमांक एका को-या कागदावर लिहुन घेवुन त्या लाच रकमेस अंथ्रासिन पावडर लावणे बाबतची कारवाई खाजगी वाहनामध्ये केली. सापळा कारवाईसंबंधाने शिर्के साहेब यांनी मला व दोन्ही पंचांना तसेच सापळा पथकास आवश्यक त्या सर्व सुचना दिल्या. त्यानंतर माझ्याकडे व्हाईस रेकर्डर देवुन पंच नं.1 यांना माझ्या सोबत माझ्या दुचाकी वाहनावरुन पाटकरी कदम यांची भेट घेण्याकामी वाई शहराचे अलीकडे वाई - वाठार जाणारे रस्त्यावर कृष्णा पुलाचे अलीकडुन रवाना केले. मी व पंच नं.1 असे वाई शहरातुन तहसिल कार्यालयाचे समोरुन जावुन जलसंपदा विभाग, शाखा अभियंता, धोम पाटबंधारे शाखा वाई, धोम डावा कालवा असा बोर्ड असलेल्या कार्यालयाचे समोर गेलो. आमचे पाठोपाठ शिर्के साहेब, पंच नं. 2 व सापळा पथक असे खाजगी वाहनाने आले. त्या ठिकाणी माझेकडील वाहन कार्यालयाचे बाहेर उभे केले. त्यावेळी मी व पंच नं.1 असे त्या कार्यालयाचे बाहेर उभे राहिलो. त्यावेळी शाखा अभियंता, धोम पाटबंधारे शाखा वाई, कार्यालयातुन कालवा निरीक्षक सुर्यवंशी आमचे जवळ आले. त्यावेळी मी त्यांचेकडे पहात, नमस्कार असे म्हणालो. त्यावेळी कालवा निरीक्षक सुर्यवंशी यांनी, झाली का चर्चा बंधु राजा बरोबर, मिळल हो असे म्हणाले. त्यावेळी माझेत व कालवा निरीक्षक सुर्यवंशी यांचेमध्ये माझे कामाबाबत चर्चा झाली. त्यानंतर कालवा निरीक्षक सुर्यवंशी यांनी, बोलवु का त्यांना असे म्हणाले. त्यानंतर कालवा निरीक्षक सुर्यवंशी यांनी त्यांचे कार्यालयाचे समोर जावुन बाहेरुनच कालवा निरीक्षक कदम यांना बोलावुन आणले. त्यावेळी मी, मी काय म्हणतोय कदम साहेब आमच्याकड लक्ष द्या म्हणजे होवु द्या असे म्हणालो. त्यावेळी कालवा निरीक्षक सुर्यवंशी यांनी, काळजी करत बसत्याल ती होवु दे, एवढ झाल नंतर टेन्शन नाय असे म्हणाले. त्यावेळी कालवा निरीक्षक कदम यांनी, माझ्याकडे लाच रक्कम कालवा निरीक्षक सुर्यवंशी यांचेकडे देणेबाबत हाताने इशारा करुन घ्या तुम्ही, घ्या ओ घ्या असे म्हणाले. त्यावेळी माझे शर्टचे छातीवरील डाव्या खिशातील 23,000/- रुपये लाच रक्कम उजव्या हाताने काढुन कालवा निरीक्षक कदम यांचे समोर धरली. त्यावेळी कालवा निरीक्षक सुर्यवंशी यांनी, घ्या की, मी काय मोजुन घ्यायचे असे म्हणुन मला सदरची लाच रक्कम कालवा निरीक्षक कदम यांचेकडे देण्यास सांगितली. त्यावेळी कालवा निरीक्षक कदम यांनी, अव घ्या घ्या पटदिशी असे म्हणुन कालवा निरीक्षक सुर्यवंशी यांना ती लाच रक्कम स्विकारण्यास सांगितले. त्यावेळी कालवा निरीक्षक सुर्यवंशी यांनी माझ्याकडुन 23,000/- रुपये लाच रक्कम डाव्या हाताने स्विकारुन, किती हायत असे विचारले. त्यावेळी मी, तेवीस हजार हायत तेवीस असे म्हणालो. त्यावेळी कालवा निरीक्षक सुर्यवंशी यांनी, चला की देतो की असे कालवा निरीक्षक कदम यांना म्हणाले. त्यावेळी कालवा निरीक्षक कदम यांनी, ठेवा की ओ तुमच्याकड असे म्हणाले. त्यावर कालवा निरीक्षक सुर्यवंशी यांनी, माझ्याकड ठेवुन काय करायच असे म्हणुन 23,000 /- रुपये लाच रक्कम कालवा निरीक्षक कदम यांचेसमोर धरली. त्यावेळी मी आव का भेताय पटदिशी घ्यायच असे म्हणालो. त्यावेळी कालवा निरीक्षक कदम यांनी ती लाच रक्कम उजव्या हाताने स्विकारत, तुम्ही नका आता, आम्ही मोजतो तिकड असे म्हणुन ती लाच रक्कम दोन्ही हाताने मोजु लागले. त्यावेळी मी तेथुन थोडे बाजुला होवुन सापळा पथकास दिसेल अशा रितीने डावा हात डोकयावरुन फिरवुन लाच रक्कम स्विकारल्याचा पुर्व नियोजित इशारा केला. तो इशारा पाहुन शिर्के साहेब, सापळा पथक व पंच नं 2 असे सर्वजण माझ्या जवळ आलात व शिर्के साहेबांनी माझ्याकडील व्हाईस रेकर्डर काढुन घेवुन तो बंद केला. त्यानंतर तेथेच उभे असलेले पंच नं 1 यांना शिर्के साहेबांनी लाच रक्कम कोणी स्विकारली असे विचारले असता त्यांनी माझे वरील प्रमाणे हकिकत सांगितली. त्यानंतर शिर्के साहेबांनी मला कक्षामध्ये बोलावुन दारे खिडकी व लाईट बंद करुन कृत्रीम अंधार करुन माझे हातांची व अंगावरील कपडयांची अल्ट्रा व्हायोलेट दिव्याचे प्रकाशात तपासणी केली असता माझ्या उजव्या हाताचे बोटांचे पेऱ्यास तसेच तळहातास व शर्टचे डाव्या बाजुचे खिशाचे आतील बाजुस व कडांस अंथ्रासिन पावडर लागलेची फिक्कट निळसर चकाकी दिसून आली नंतर कक्षामध्ये उजेड केला. त्यानंतर शिर्के साहेबांनी मला कक्षाच्या बाहेर थांबण्यास सांगितले.त्यानंतर कालवा निरीक्षक, कदम व कालवा निरीक्षक सुर्यवंशी यांना ताब्यात घेवुन शिर्के साहेब व दोन्ही पंच तसेच सापळा पथक व मी असे सोबतच्या वाहनांनी शासकीय विश्रामगृह वाई येथे आलो. त्या ठिकाणी शिर्के साहेबांनी मला विश्रामगृहाचे बाहेर थांबण्यास सांगुन सर्वजण विश्रामगृह कक्ष नं.1 व 2 मध्ये गेले. त्यानंतर मला कक्षामध्ये बोलावुन घेवुन दोन्ही पंचांनी माझी अंगझडती घेतली. त्यानंतर शिर्के साहेबांनी, माझे व पंच नं. 1 काटकर यांचे सांगणेप्रमाणे संभाषणाचे स्क्रिप्ट मधील नामोल्लेख केला. त्यानंतर मला पुन्हा कक्षाचे बाहेर थांबण्यास सांगितले. त्यानंतर काही वेळाने पुन्हा मला कक्षात बोलावुन घेवुन मला घडलेली हकिकत विचारली. तरी दिनांक 01/10/2019 रोजीचे पडताळणी व सापळा कारवाईमध्ये राजेंद्र वसंतराव कदम, वय - 54 वर्षे, कालवा निरीक्षक शाखा अभियंता, धोम पाटबंधारे शाखा वाई धोम डावा कालवा, जलसंपदा विभाग वाई ता.वाई जि.सातारा रा.गाडेबाग आळी, बावधन, ता.वाई जि.सातारा यांनी माझ्याकडे शेतीसाठी कनालवरुन पाणी उचलण्याचा परवान्याची फाईल तयार करुन पाणी उचलण्याचा परवाना मिळवुन देण्यासाठी 23000/- रुपयाची लाच मागणी केली व श्री.सुहास बाळासाहेब सुर्यवंशी, कालवा निरीक्षक, वय -34 वर्षे रा.केंजळ ता.वाई जि. सातारा यांनी लाच मागणी करत असताना लाच मागणीस प्रोत्साहन देवुन ती लाच रक्कम शाखा

अभियंता, धोम पाटबंधारे शाखा वाई धोम डावा कालवा, जलसंपदा विभाग वाई या कार्यालयाचे समोर दि.01/10/2019 रोजी 13.00 वाजण्याचे सुमारास माझ्याकडुन स्विकारली म्हणुन माझी त्या दोघांचे विरुध्द तक्रार आहे.ही खबर दिली

**13. Action** **Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at** (केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले): Anandrao Tukaram Khobare(I (Inspector)) / POBN67110 **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):
**Rank** (पद):
**No.**(क्र.): **to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):
**District** (जिल्हा):
**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

**14. Signature/Thumb impression of the complainant / informant.**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

**15. Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

पोलीस स्टेशन ऑफिस
वाई पोलीस ठाणे

**Signature of Officer in charge, Police Station** (ठाणे प्रभारी अधिका-याची

**Name** (नाव): Anandrao Tukaram Khobare
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): POBN67110

**Attachment to item 7 of First Information Report** (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र):

**Physical features, deformities and other details of the suspect/accused: ( If known /**
(संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्टये, व्यंग आणि इतर तपशील))

| S.No.(अ.क्र.) | Sex (लिंग) | Date/Year of Birth (जन्म | Build (बांधा) | Height (cms.) (उंची | Complexion (रंग) | Identification Mark(s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |
| 2 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |

| Deformities/ Peculiarities | Teeth (दात) | Hair (केस) | Eyes (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit(s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |
| | | | | | |

| Language /Dialect (भाषा/बोलीभाषा) | Place Of (का स्थान) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
**(**जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.**)**